**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ ची शपथेवर साक्ष**

मी देवाशपथ खरे सांगतो की :

माझे नावः शरद काशिनाथ कोटकर

वयः ५४ वर्षे, व्यवसायः पो.शि. १५०५ रोहा पोलीस ठाणे

राहणारः पिंगळसई, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :**

०१. सन २०२२–२३ मध्ये माझी नेमणुक रोहा पोलीस ठाण्यात होती. दि. ०५/०३/२०२३ रोजी हिवरकर साहेबांनी आम्हाला त्यांच्या कक्षात बोलावुन यशवंतखार गावात बसस्टँडच्या मागे गावठी हातभट्टी विक्रीचा व्यवसाय चालु आहे अशी गोपणीय बातमी मिळाल्याचे सांगुन त्याप्रमाणे कारवाई करण्यास सांगितले. त्यावेळी माझ्यासोबत पो.उप.नि. हिवरकर, पो.ना. शिरसाठ, म.पो.हवा साळुंखे, म.पो.हवा महाडीक असे सर्वजण खाजगी वाहनाने त्या ठिकाणी रवाना झालो. हिवरकर साहेबांनी गावातील दोन पंचाना बोलावले व त्यांना घटनेची हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही बसस्टँडच्या पाठीमागे पायी चालत गेलो असता तेथे एक इसम डोक्यावर टोपी घालुन दारु विक्री करताना आढळुन आला. आम्ही त्याला पकडले. पंचासमक्ष त्याच्याकडे असलेल्या पाच लिटरच्या ड्रमचा वास घेतला असता त्यामध्ये वास आला. त्या इसमाला आम्ही त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव काशिनाथ म्हात्रे वय ३९ असे सांगितले. त्याच्याकडे असलेल्या ड्रममध्ये पाच लिटर दारु होती. पंच दत्ता दांडेकर व संभाजी देवकर या पंचापुढे त्या दारुतुन १८० मि.ली दारु नमुन्यासाठी वेगळी करुन त्याला सिल केले. कारवाईचा पंचनामा केला व त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या.

०२. मी सदर कारवाईचे एकुण ०४ फोटो माझ्या मोबाईलमधुन काढले व ते

पोलीस ठाण्यात आल्यानंतर पेनड्राईव्ह मधुन लोड केले. त्यांना कॉम्प्युटरमध्ये घेऊन त्याची प्रिंट काढली. ते फोटो तपासी अधिकारी यांना दिले. मी भा.पु.का कलम ६५ ब अन्वये आवश्यक प्रमाणपत्र दिले. आता मला दाखवलेले प्रमाणपत्र तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १०** देण्यात येत आहे. त्या ०४ फोटोंना एकत्रीतपणे **नि.क्र. ११** देण्यात येत आहे.

०३. त्यानंतर मी सदर प्रकरणातील नमुना बाटली रासायनीक विश्लेशन कलिना येथे पोहचविली. त्याची मिळालेली पोहोच तपासी अधिकारी यांना दिली. आता मला दाखवलेली सदर पोहोच तिच असुन त्यावर माझी तसेच प्रयोगशाळेतील संबंधीत लिपीकाची स्विकारणार म्हणुन सही आहे. त्यास **नि.क्र. १२** देण्यात येत आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी तो न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एच. पाटकर यांच्यामार्फत सुरू...</u>**

०४. मी सन २०२२ पुर्वी देखील रोहा पोलीस ठाण्यात कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ रोहा पोलीस ठाण्यापासुन १५ किलोमीटर अंतरावर आहे. आरोपी दारु व्यवसाय करत असल्याची बातमी संध्याकाळी ०६.३० वाजता मिळाली होती. सदर बातमीची शहानिशा बनावट ग्राहक पाठवुन केली होती. तसे माझ्या जबाबात नमुद नाही. आम्ही छापा पथकातील सदस्य प्रत्येकजन स्वतंत्र खाजगी वाहनाने गेलो होतो. त्या वाहनांचा तपशील माझ्या जबाबात नमुद नाही. त्या दिवसानंतर मी पुन्हा घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, एस.टी. स्टँडच्या पाठीमागे गावात जाण्यासाठी अंतर्गत रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर अनेक लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तो रस्ता रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने टोपी घातली होती असे माझ्या जबाबात नमुद नाही. घटनास्थळी कोणी येऊ–

जाऊ शकते. हे म्हणणे खरे आहे की, पंच साक्षीदार आत गावात राहतात. स्टँडपासुन २०–२५ पावलांच्या अंतरावर घटनास्थळ होते. हे म्हणणे खरे आहे की, स्टँड रस्त्याकडे तोंड करुन असुन त्या रस्त्यावर टमटम व इतर गाड्यांची गर्दी असते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी वैयक्तीक वापराच्या मोबाईमधुन फोटो काढले. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईमधील फोटो एडीट करता येतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यात ड्रममध्ये ०५ लिटर दारु मिळाल्याचे त्याप्रमाणे आम्ही कारवाई केल्याचे खोटे सांगत आहे. घटनास्थळी आम्ही ०७.३० वाजता पोहचलो. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर कारवाईचे फोटो काढल्याचे खोटे सांगत आहे. मी घटनेनंतर १०–१२ दिवसांनी नमुना बाटली घेऊन प्रयोगशाळेत गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रयोगशाळेत जाताना इतर गुन्ह्यातील नमुना बाटल्या देखील आम्ही नेतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यात मिळालेल्या मुद्देमालातुन वेगळी केलेल्या नमुन्याची बाटली प्रयोगशाळेत पोहोचवली व त्याप्रमाणे पोहोच घेतली असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब–याचदा बेवारस मुद्देमाल सापडतो. हे म्हणणे खरे नाही की, बेवारस सापडलेली दारु आरोपीवर थोपवुन खोटी केस दाखल केली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.10.14 18:46:50 +1100

स्थळ : रोहा. (एस. व्ही. खैरे)

दि.१४.१०.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.